**MHPU040066432026**

दाखल दिनांक – १२.०२.२०२६
नोंदणी दिनांक – १२.०२.२०२६
निकाल दिनांक– ०८.०७.२०२६

| कालावधी – | वर्षे | महिने | दिवस |
|---|---|---|---|
| | ०० | ०४ | २४ |

**निशाणी क्र. ८ लगत**

महाराष्ट्र शासन वि. अमोल मोरे

**न्या य नि र्ण य**

( घोषित दिनांक ०८ जुलै २०२६ )

दिनांक २३.११.२०२५ रोजी ००:२० वाजता सिंहगड रोड वाहतुक विभागातील पो.नि. सुनिल गवळी, पो.हवा. महेंद्र राऊत, पो.शि. गोविंद गोंजारे असे मिळून सिंहगड रोड वाहतुक विभाग हद्दीत वडगाव चौक, सिंहगड रोड, पुणे येथे नाकाबंदी कर्तव्यावर असताना आरोपी त्याच्या ताब्यातील चारचाकी क्र. एम.एच. १२ वाय.डी. २३१८ वेडीवाकडी व भरधाव वेगाने चालवत येत असलेला दिसला. त्यास थांबविले असता त्याच्या तोंडाचा मादक पदार्थ सेवन केल्यासारखा उग्र वास येत होता. म्हणुन पो.नि. सुनिल गवळी यांनी उच्छवासक विश्लेषण यंत्राद्वारे आरोपीच्या श्वासाची चाचणी घेतली असता त्याच्या श्वासामध्ये ४०.८ एम.जी. प्रति १०० मिली इतके अल्कोहोलचे प्रमाण आढळून आले. सबब, आरोपी मद्यार्काच्या अंमलाखाली सार्वजनिक रस्त्यावर मानवी जीवन धोक्यात येईल अशा पद्धतीने चालवून गुन्हा केलेबाबत पो.हवा. महेंद्र राऊत यांनी आरोपीच्या विरुध्द मोटार वाहन कायदा कलम १८४ व १८५ अन्वये फिर्याद दाखल केली. तपासीक अधिकारी पो.नि. सुनिल गवळी यांनी गुन्ह्याचा तपास करुन दोषारोपपत्र दाखल केले आहे.

२. प्रस्तुत प्रकरणात आरोपी हजर झाल्यानंतर मी निशाणी ८ कडे त्याचे विरुध्द लावण्यात आलेल्या आरोपाचा आशय नोंदविला. त्याने गुन्हा नाकबुल करुन संपरिक्षा घेण्याची विनंती केली.

**३.** अभियोग पक्षाच्या वतीने निशाणी क्र. ८ लगत एकूण २ साक्षीदार तपासण्यात आले. आरोपीचा भारतीय नागरिक सुरक्षा संहिता कलम ३५१ अन्वये जबाब निशाणी क्र. ८ लगतच नोंदविण्यात आला आहे. आरोपीने संपुर्ण नकाराचा व खोट्या गुन्ह्यात गुंतविल्याचा बचाव घेतला आहे.

**४.** खटला निर्णत करण्यास माझ्यासमोर खालील मुद्दे उपस्थित झाले. त्यांचे निष्कर्ष मी त्याखाली नमुद कारणमीमांसेसह पुढील प्रमाणे नोंदविले आहे.

| **अनु. क्र.** | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १. | अभियोगपक्ष सिद्ध करतो काय की, दि. २३.११.२०२५ रोजी ००:२० वाजण्याच्या सुमारास वडगाव चौक, सिंहगड रोड, पुणे येथे आरोपीने त्याच्या ताब्यातील वाहन क्र. एम.एच. १२ वाय.डी. २३१८ हे मद्यसेवन करुन, मद्यार्काच्या अंमलाखाली मानवी जिवीतास धोकादायक होईल अशा तऱ्हेने वेडेवाकडे वाहन चालविले व त्यायोगे त्याने मोटार वाहन कायदा, १९८८ चे कलम १८४ व १८५ अन्वये अपराध केला ? | नाही.. |
| २. | आदेश काय ? | अंतिम आदेशाप्रमाणे |

## <u>का र ण मि मां सा</u>

**<u>मुद्दा क्र.१ करीता –</u>**

**५.** अभियोगपक्षातर्फे तपासण्यात आलेले पो.हवा. महेंद्र राऊत (सा.क्र.१) आणि पो.नि. सुनिल गवळी (सा.क्र.२) हे त्यांच्या पुराव्यात असे सांगतात की, दि. २३.११.२०२५ आणि २४.११.२०२५ रोजीचे रात्री ते पो.शि. गोविंद गोंजारे यांचेसह सिंहगड रोड वाहतुक विभाग हद्दीत वडगाव चौक, सिंहगड रोड येथे दारु पिवून वाहन चालविणाऱ्या वाहन चालकांवर कारवाई करण्यासाठी नाकाबंदी करत असताना आरोपी

चारचाकी क्र. एम.एच. १२ वाय.डी. २३१८ ही वडगाव चौक, सिंहगड रोड येथे वेडीवाकडी येत असताना त्यांना दिसला. त्यांनी आरोपीस थांबविले असता त्याच्या तोंडाचा उग्र वास येत होता, म्हणुन पो.नि. सुनिल गवळी (सा.क्र.२) यांनी आरोपीच्या श्वासाची उच्छवासक चाचणी यंत्राद्वारे तपासणी केली असता त्याच्या श्वासामध्ये ४०.८ मि.ली.ग्रॅम/ १०० मिली इतके मद्यार्काचे प्रमाण आढळुन आले. म्हणून पो.हवा. महेंद्र राऊत (सा.क्र.१) यांनी आरोपीच्या विरुध्द फिर्याद (नि.क्र. १०/पी–१) दाखल केली. पो.हवा. महेंद्र राऊत (सा.क्र.१) यांच्या पुराव्यातुन फिर्याद शाबीत केली आहे. त्याचप्रमाणे पो.नि. सुनिल गवळी (सा.क्र.२) यांच्या पुराव्यातुन उच्छवासक चाचणी अहवाल (नि.क्र. १२/पी–२), त्यांनी आरोपीस दिलेले समजपत्र (नि.क्र.१४/पी–२), भारतीय साक्ष अधिनियम कलम ६३ अन्वये प्रमाणपत्र (नि.क्र.१३/पी–२) शाबीत केले आहे. तथापी, ज्या उच्छवासक यंत्रातुन आरोपीची तपासणी केली होती त्याचे वैध कालावधीतील कॅलिब्रेशन केले बाबतचे प्रमाणपत्राची छायांकित प्रत तसेच पो.नि. सुनिल गवळी यांनी उच्छवासक यंत्र हाताळण्याचे प्रशिक्षण घेतलेबाबतच्या प्रमाणपत्राची छायांकित प्रत दाखल केली आहे. सदर दोन्ही दस्तऐवज शाबीत झालेले नाहीत.

६. बचाव पक्षाच्या वतीने दोन्ही साक्षीदारांचा घेतलेला उलटतपास पाहता, उपरोक्त घटनेच्या वेळी नाकाबंदी दरम्यान आरोपीला थांबवुन त्याची उच्छवासक यंत्राद्वारे तपासणी केल्याची बाब नाकारलेली नाही. तथापी, आरोपीवर केलेली कारवाई दि. २३.११.२०२५ आणि २४.११.२०२५ च्या रात्री केली असल्याचे फिर्यादीने मान्य केले आहे. आरोपीची तपासणी करण्यास १ मिनीटाचा वेळ लागला होता, घटनेच्या रात्री २ ते ४ वाहन चालकांवर कारवाई केली होती आणि सर्व वाहन चालकांची एकाच उच्छवासक यंत्रातून तपासणी केली होती, आरोपीच्या रक्त व लघवीची तपासणी प्रयोगशाळेतून करुन घेतली नाही, तसेच केवळ आरोपीच्या तोंडाचा वास येत होता आणि तो बोलताना अडखळत होता म्हणून त्याच्यावर कारवाई केले असल्याचे दोन्ही साक्षीदारांनी कबुल केले आहे.

७. एकंदरीत अभियोग पक्षाने उपरोक्त घटनेच्या वेळी आरोपीने मद्यप्राशन केले होते असे शाबीत करण्यासाठी केवळ उच्छवासक चाचणी अहवाल (नि.क्र.१२/पी–२) वर आपली भिस्त ठेवली आहे. मा. सर्वोच्च न्यायालयाच्या ***बच्चुभाई हसोनीअली कारयानी वि. महाराष्ट्र शासन, १९७१(३) एससीसी १३०,*** या प्रकरणातील न्यायनिवाड्यामध्ये असे अभिमत नोंदविले आहे की,

> *"केवळ अपीलकर्त्याच्या श्वासाला मद्याचा वास येत होता किंवा त्याची चाल अस्थिर होती यावरुन त्याने मद्यसेवन केले आहे, तो अस्थिर होता, त्याची बोलण्याची पद्धत विस्कळीत होती आणि त्याच्या डोळ्यांच्या बाहुल्या रुंदावलेल्या होत्या असा निष्कर्ष काढता येत नाही. मद्यपान केल्याचा संशय असलेल्या व्यक्तीच्या रक्ताची आणि लघवीची तपासणी करुनच मद्यपान निश्चित केले जाऊ शकते'''.*

८. प्रस्तुत प्रकरणात आरोपीच्या रक्ताची व लघवीची वैद्यकिय चाचणी करण्यात आली नाही. ज्या उच्छवासक चाचणी यंत्रातुन त्याच्या श्वासाची चाचणी घेण्यात आली होती त्याचे नोजल बदलण्यात आले होते हे साक्षीदारांच्या पुराव्यातुन ठामपणे शाबीत होत नाही. उच्छवासक चाचणी अहवाल हा अंतीम पुरवा ठरत नाही. तपासीक अधिकारी यांनी घटनेनंतर लागलीच आरोपीच्या रक्त व लघवीची प्रयोगशाळेतून तपासणी केली असती तर आरोपीच्या रक्तामध्ये अल्कोहोलचे निश्चित किती प्रमाण आहे याबाबत विश्वासपात्र पुरावा समोर आला असता. परंतु, तपासीक अधिकारी यांनी योग्य पुरावा न्यायालयासमोर सादर करण्याची तसदी घेतली नाही. आरोपी भरधाव वेगात व वेडीवाकडी गाडी चालवत होता याबाबत पोलीस साक्षीदारांच्या तोंडी पुराव्याशिवाय अन्य पुरावा नाही. दोन्ही साक्षीदार खटल्यात नमुद नाकाबंदी कारवाई दि. २३.११.२०२५ चे रात्री ११:०० वाजल्यापासून दि. २४.११.२०२५ रोजीचे पहाटे ०२:०० वाजेपर्यंत केल्याचे सांगतात. परंतु, उच्छवासक चाचणी अहवाल नि.क्र.१२/पी–२ चे अवलोकन केले असता, सदरचा अहवाल दि. २३.११.२०२५ रोजीचा ००:२० वाजताचा आहे. परंतु दोन्ही साक्षीदारांच्या सरतपासातून

सदरची कारवाई दि. २३.११.२०२५ रोजीचे २३:०० वाजलेपासून सुरु केली आहे. सबब, अहवाल नि.क्र.१२/पी–२ मधील वेळ आणि साक्षीदारांचा मौंखीक पुरावा एकमेकांना पुष्टी देत नाही. अशा परिस्थितीत मा. सर्वोच्च न्यायालयाच्या उपरोक्त निवाड्यातील निष्कर्षाचा विचार करता, अभियोग पक्षाकडून सादर करण्यात आलेला पुरावा आरोपीने मद्यप्राशन करुन सार्वजनिक रस्त्यावर वाहन चालवून मोटार वाहन कायदा कलम १८४ व १८५ अन्वये शिक्षापात्र अपराध केला असे सर्व संशयाच्या पलिकडे जाऊन शाबीत करण्यासाठी ठाम, विश्वासपात्र व पुरेसा नाही.

**९.** कलम १३०(१)/१७७ बाबत विचार करता, अभियोग पक्षाचे दोन्ही साक्षीदार यांच्या सरतपासाचे साकल्याने अवलोकन केले असता, उपरोक्त घटनेच्या वेळी आरोपीकडे त्याचा वाहन चालविण्याचा परवाना मागितला होता व तो त्याने दिला नाही असे सांगितले आहे. परंतु घटनेच्या वेळी आरोपीने त्याचा वाहन चालविण्याच्या परवाना मोबाईल मधून दाखविला होता, दोषारोपपत्रासोबत देखील आरोपीचा वाहन चालविण्याचा परवान्याची छायांकित प्रत तपासीक अधिकारी यांनी सादर केली आहे. सबब, आरोपीने घटनेच्या वेळी त्याचा वाहन चालविण्याचा परवाना दिला नाही ही अभियोग पक्षाची हकीगत सत्य वाटत नाही. अशा परिस्थितीत आरोपीने मो.वा.का.क. १३०(१)/१७७ अन्वये गुन्हा केल्याचेही शाबीत होत नाही. सबब, आरोपीने मोटार वाहन कायदा कलम १८४, १८५ आणि १३०(१)/१७७ अन्वये गुन्हा केला सर्व संशयाच्या पलिकडे जावून शाबीत करण्यास अभियोग पक्ष अपयशी ठरला आहे. करीता, मी मुद्दा क्र. १ चा निष्कर्ष नकारार्थी नोंदविला आहे.

**मुद्दा <u>क्र.२ करीता–</u>**

**१०.** माझे उपरोक्त विवेचनावरुन आरोपीने मद्यार्काच्या अंमलाखाली वाहन चालवून मोटार वाहन कायदा कलम १८४, १८५ आणि १३०(१)/१७७ अन्वये त्याच्याविरुध्द लावण्यात आलेला आरोप शाबीत करण्यास अभियोग पक्ष अपयशी ठरला आहे. सबब,

आरोपी त्यास संशयाचा फायदा देऊन निर्दोष मुक्त होण्यास पात्र आहे. करीता, मुद्दा क्र. २ च्या उत्तरार्थ खालील आदेश पारीत करीत आहे.

**<u>आ दे श</u>**

१. आरोपी अमोल जनार्दन मोरे याची मोटार वाहन अधिनियम १९८८ चे कलम १८४, १८५ आणि १३०(१)/१७७ अन्वयेच्या शिक्षापात्र गुन्ह्याच्या दोषारोपातून भारतीय नागरिक सुरक्षा संहिता, २०२३ चे कलम २८७ अन्वये निर्दोष मुक्तता करण्यात येत आहे.

२. आरोपीचे वैयक्तीक बंधपत्र व जामीनकदबा रद्द करण्यात येत आहे.

३. आरोपीने न्यायालयात भरलेली जामीनाची रक्कम रु. ५,०००/- (अक्षरी रुपये पाच हजार मात्र) त्यास परत करण्यात यावी.

(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात घोषित करणेत आला)

DISTRICT COURTS MAHARASHTRA
Digitally signed by SADANAND BABURAO PATIL
Date: 2026.07.08 17:58:54 +0530

स्थळ : पुणे.
दि. ०८.०७.२०२६

(**सदानंद बा. पाटील**)
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग
मोटार वाहन न्यायालय, पुणे.

**प्रमाणपत्र**

मी अभिकथन करतो की, या पी. डी. एफ. करुन अपलोड केलेल्या न्यायनिर्णयामधील शब्द–नि–शब्द हे मूळ न्यायनिर्णयाप्रमाणे आहेत.

| | | |
|---|---|---|
| लघुलेखकाचे नाव | : | व्ही. एस. चिंतनपल्ली, श्रेणी–३ |
| न्यायालयाचे नाव | : | न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग, मोटार वाहन न्यायालय पुणे. |
| न्यायनिर्णयाची तारीख | : | ०८.०७.२०२६ |
| न्यायनिर्णयावर पीठासीन अधिकारी यांनी स्वाक्षरी केल्याची तारीख | : | ०८.०७.२०२६ |
| न्यायनिर्णय अपलोड केल्याची तारीख | : | ०८.०७.२०२६ |